# 'टेलिमेडिसिन'चा ३८ हजार नागरिकांना लाभ

पुणे, ता. १८ : ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी भारत फोर्जने पुणे आणि सातारा जिल्ह्यांतील आठ गावांत सुरू केलेल्या टेलिमेडिसिन सुविधेचा आजवर ३८ हजार ७९७ नागरिकांनी लाभ घेतला आहे.

भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबासाहेब कल्याणी यांची कौटुंबिक पार्श्वभूमी खेड्यातील असल्याने ग्रामीण भागांतील विविध समस्या सोडविण्यासाठी ते नेहमीच पुढाकार घेतात. त्याअंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने सीएसआर प्रकल्पांतर्गत भारत फोर्जने निवडक १०० गावांतील सोयी सुविधांकडे विशेष लक्ष देत पाणी, शिक्षण, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि रोजगार यासाठी गावांना मदत केली.



पुणे : पुणे आणि सातारा जिल्ह्यांतील आठ गावांत भारत फोर्जद्वारे सामाजिक जाणिवेच्या जबाबदारीतून (सीएसआर) सुरू झालेल्या टेलिमेडिसिन सुविधेचा लाभ घेताना ग्रामस्थ.

सर्वसामान्यांना कोणताही अतिरिक्त आर्थिक भार सोसावा न लागता देशांतर्गत स्तरावर कुठेही चांगल्या दर्जाच्या प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, सुविधांचा दर्जा सुधारणे आणि आरोग्यसुविधा वितरणाचा खर्च कमी करणे, यासाठीचा आदर्श उपाय म्हणजे टेलिमेडिसिन सुविधा. व्हिडिओ कॉलद्वारे ग्रामीण भागांतील अगदी शेवटच्या घटकापर्यंत प्राथमिक आरोग्य सुविधा व वैद्यकीय मार्गदर्शन पोहोचविता येते.

भारत फोर्जने महाराष्ट्रात पुणे व सातारा जिल्ह्यांत सॅटेलाइट सुविधेच्या साह्याने टेलिमेडिसिन सुविधेचा तीन वर्षांपूर्वी प्रारंभ केला. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यांतील ठाकरेवाडी, चिखली, फडाळेवाडी येथील वाड्या वस्त्यांवर तसेच सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील धामणेर, कण्हेरखेड, रुई, नागझरी व जयपूर अशा एकूण आठ गावांमध्ये ८ टेलिमेडिसिन सेवा केंद्रे उभारली आहेत.

आजार आणि उपचारांबरोबरच औषधे मिळण्याची सुविधा येथे असल्याने गावकऱ्यांच्या मनात विश्वास निर्माण करण्यात भारत फोर्जला यश आले. या केंद्रांमुळे प्राथमिक उपचार मिळवण्यासाठी ग्रामस्थांची पायपीट थांबली आहे.